# अकोला जिल्हा पोलीस विभागातर्फे जनतेला आव्हान

प्रिय नागरीकांनो,

आपल्या जिल्हयांतील नागरीकांची सुरक्षा, संरक्षण आणि स्वास्थ यादृष्टीने प्रामुख्याने कायदयाच्या आवर आणि त्याची परिणामकारक अंमलबजावणी यावर अवलंबुन असल्या तरी, जनता तत्पर, जागरूक आणि कर्तव्यदक्ष असल्यास त्यास अतिशय चांगला हातभार लागतो. किंबहुना अफाट लोकसंख्या आणि त्यासाठी करावी लागणारी पोलीसांची तजविज यातील दरी लक्षात घेता पोलीस आणि जनता यांच्यातील सहकार्य अपरिहार्य ठरते.

नागरीक जागरूक असल्यास बरेच गुन्हे घडण्याआधीच त्यांचा बिमोड करणे किंवा ते उघडकीस आणणे शक्य असते. तेव्हा आपले घर आणि आजुबाजूचा परिसर सुरक्षित आणि गुन्हेगारांपासुन मुक्त राहण्यासाठी खालील सुचनांचे काळजीपुर्वक पालन केल्यास आपले जिवन सुसहय व भयरहीत होईल.

## स्व:निवास सुरक्षा

१. शक्य तो आपल्याकडे असणारे मौल्यवान दागीने लॉकरमध्येच ठेवा व आवश्यक तेवढीच रक्कम व दागीने घरामध्ये ठेवनु उर्वरीत रक्कम बॅंकेमध्ये ठेवा.
२. घरामध्ये तिजोरी भिंतीमध्ये बसविलेली असावी.
३. दरवाज्याला असणारी कडी,कोंढे हे सुयोग्य स्थितीत तसेच मजबुत असावीत.
४. दरवाज्याला, पेटीला लावण्यांत येणारी कुलूपे चांगल्या दर्जाचे वापरावे.
५. शक्य तो घरातील सर्व मंडळींनी घर बंद करून गांवाला जाण्याचे टाळावे. परंतु घरातील सर्वांनाच घर बंद करून बाहेर गांवी जावयाचे असल्यास त्याबाबतची सुचना पो.स्टेशनला अगोदरच दयावी,म्हणजे रात्री गस्ती दरम्यान त्या घरावर पोलीसांना विशेष लक्ष देता येईल. तसेच शेजा-यांना सुध्दा बाहेर गांवी जात असल्याची कल्पना दयावी व घरावर नजर ठेवण्यांस सांगावे.
६. मौल्यवान वस्तु किंवा पैसे सहजासहजी दृष्टीस पडतील किंवा सापडतील अशा ठिकाणी ठेवु नये.
७. पैसे, मौल्यवान वस्तु काढणे किंवा ठेवणे इत्यादी अनोळखी व्यक्ती समोर कधी करू नका.
८. नोकर,रखवालदार गडी किंवा अन्य कोणाची नेमणुक करण्याआधी त्याची योग्य त-हेने चौकशी करूनच नेमणुक करा.स्वत: विषयी माहिती न देणा-या व्यक्तींची नेमणुक करू नका. तसेच त्यांची वागणुक संशयास्पद वाटल्यास त्यांना तात्काळ कामावरुन काढुन टाका.
९. कामासाठी येणारे प्लंबर,इलेक्ट्रीशियन, पेन्टर इ.ची चौकशी करूनच त्यांना काम सोपवा.
१०.गृहनिर्माण संस्थेत ये-जा करणा-या व्यक्तींची नोंद ठेवा, तसेच अनोळखी वाहने गृहनिर्माण संस्थेत किंवा जवळपास बरेच काळापासुन उभी असल्यास त्याबाबत पोलीस स्टेशनला कळवा.
११.आपले शेजारी बाहेरगांवी गेल्यास कर्तव्य समजुन आपण त्यांचे घराकडे लक्ष ठेवुन त्यांना सहकार्य करा.

१२.आपले घरातील नोकरांसमोर आपल्या दौ-या विषयी  किंवा आर्थिक बाबी वा मौल्यवान दागीन्यांविषयी चर्चा करु नका.याबाबत घरातील इतर सदस्य तसेच मुलांना देखील दक्षता घ्यावयास सांगा.

१३.अधिक कालावधीसाठी घर बंद ठेवणे आवश्यक असल्यास घराचे कुलूप बदलुन घ्यावे.

१४.घर बंद करून बाहेर जातांना कपाटाच्या किल्ल्या टेबलाची खण,उशाखाली,गादीखाली किंवा खुंटीवर ठेवु नका.

१५.घराच्या मुख्य दरवाज्यास असणा-या कुलूपाच्या किल्ल्या फुलदानीखाली, पायपुसणीखाली, खिडकी अथवा दरवाज्याच्या चौकटीवर ठेवु नका, कारण घरफोडी करणारे गुन्हेगार अशा ठिकाणी सर्वप्रथम किल्ल्याचा शोध घेतात.

१६.घरातील मुलांना दरवाज्यावरील पिंपहोलचा (Door Eye ) वापर करायला शिकवा.आलेली व्यक्ती अनोळखी असल्यास मुलांनी घरातील मोठया व्यक्तींना विचारून दार उघडण्यासाठी तसेच मुले घरात एकटी असल्यास त्यांना अनोळखी व्यक्ती आल्यास दार न उघडण्याच्या सुचना दयाव्या. अनोळखी व्यक्तीस घरात प्रवेश देवु नका. आपणांस काही क्षणापुरते जरी घराबाहेर किंवा घरामध्ये आंत जायचे असल्यास घराचे सर्व दरवाजे व्यवस्थित बंद करा.

१७.आपल्या घरी पेईंग गेस्ट ठेवतांना किंवा जागा/घर भाडयाने देतांना आवश्यक भाडे करार करा. तसेच संबंधित व्यक्तींची संपुर्ण माहिती उदा.त्यांचा गांवचा पत्ता, जवळपासचे संदर्भ, छायाचित्र,दुरध्वनी क्रमांक, गांवात त्यास ओळणारे व्यक्तींची नांवे,इत्यादी गोष्टी नोंदवुन घ्या आणि या माहितीची एक प्रत जवळपासचे पोलीस स्टेशनला दया.

१८.शक्यतो जिन्या ऐवजी उदवाहनाचा वापर करा. शक्य असल्यास झायकाम (Zicom) किंवा इतर कंपनीने तयार केलेल्या सिक्युरीटी सिस्टीम घरात लावा.

## धोका टाळण्यासाठी कुटूंबातील सर्व सदस्यांनी आपले सुरक्षिततेविषयी दिलेल्या सुचनांची गांभीर्याने दखल घ्यावी.

१. कार्यालयात रखवालदाराची नेमणुक करतांना कोणत्याही प्रकारचा धोका पत्करू नका. नावाजलेल्या एजंसी मार्फतच रखवालदाराची नेमणुक करा. तसेच फिंगर प्रिंट व फोटोग्राफर पोलीस स्टेशनला ठेवावे.

२. सी.सी.(क्लोज सर्कीट) टि.व्हि.अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा, अलार्म सिस्टम सारख्या संरक्षक उपकरणांचा शक्य असेल तेथे वापर करावा.

३. अनोळखी व्यक्तींच्या किंवा नोकरांच्या नजरेस पडेल अशा रितीने मोठया रोकड रकमांची हाताळणी करू नका.

४. बेवारस वस्तु किंवा वाहनांच्या बाबतीत सावधानता बाळगण्याच्या सुचना रखवालदारास दया. तसेच त्या संबंधी माहिती नजीकचे पोलीस स्टेशनला कळवा.

## तुमचे वाहन

१.तुमची स्कुटर,मोटार मोटार सायकल किंवा वाहनास लॉक करण्यास विसरू नका.

२.इग्नीशन चाबी इग्नीशन स्विचमध्ये विसरू नका.

३.वाहनाला स्टिअरींग लॉक, क्लच लॉक आणि ब्रेक सारखी संरक्षण उपकरणे बसवा.
४.या सर्व बांबींची दक्षता घेतल्यानंतर देखील वाहनांमध्ये महत्वाचे कागदपत्रे किंवा मौल्यवान वस्तु अथवा रोकड ठेवु नका.
५.अधिक सावधानतेच्या दृष्टीकोनातुन गाडीच्या विंड स्क्रिनवर आणि खिडकीच्या काचावर गोडीचा क्रमांक कोरून ठेवा.
६.वाहनासंबंधिच्या कागदपत्रांची छायांकीत प्रत घरात किंवा कार्यालयात अवश्य ठेवा.
७.वाहनांची चोरी झाल्यास वाहनाची रजि.नं.,चेसीस नं,इंजिन नं. इत्यादी ताबडतोब पोलीस स्टेशनला आणि विमा कंपनीला कळवा.
८.अनोळखी व्यक्तीस आपले वाहन चालविण्यास अथवा भाडयाने देवु नका तसेच विकु नका.

## वाहनामध्ये असतांना

१.वाहन चालु करतांना लक्ष विचलीत होवु देवु नका.
२.डाव्या बाजुची खिडकी विशेष करून त्या बाजुला कोणी बसलेले नसल्यास उघडी ठेवु नका.
३.गाडीचा मागील दरवाजा आणि डावी कडील दरवाजा लॉक करा.
४.तुमची बॅग किंवा इतर सामान, डॅशबोर्ड, आणि पुढील सिटच्या मधल्या जागेत किंवा पुढील, मागील सिटच्या मधल्या जागेत तळाशी ठेवा,ते सिटवर ठेवु नका.
५.कोणी पत्ता विचारल्यास, आपले पैसे खाली पडल्याचे सांगीतल्यास किंवा आपल्या वाहनास उजवी कडुन धडक देवुन भांडण उकरल्यास लक्ष विचलीत होवु न देता सावध रहा, कारण असे नेमकेच त्याच वेळी गुन्हेगारांचे साथिदार आपले पॉकेट,बॅग,मोबाईल चोरण्याची संधी साधतात. तसे गुन्हेगार नेहमी संघटीतपणे गुन्हा करतात.
६.आपल्या बॅगची,मोबाईल फोनची किंवा मौल्यवान वस्तुची काळजी घेवुनच अशा इसमांशी बोला.
७.सिग्नल,रेल्वे फाटक अशा ठिकाणी किंवा रस्त्याचे बाजुला गाडी उभी करतांना विशेष खबरदारी घ्या.
८.अनोळखी व्यक्तीस आपल्या वाहनांत बसवु नका अथव लिप्ट देवु नका.
९.काही घटना घडल्यास जरी गैरसोयीचे असेल तरी नेहमी पोलीस स्टेशनला माहिती दया.

## बस किंवा रेल्वेमध्ये प्रवास करतांना

१.नेहमी संघटीतपणे गुन्हा करणा-या खिसेकापुंपासुन सावध रहा. खिसेकापुच्या २,३ व्यक्ती तुम्हाला घेरून ढकलतात व तुमच्या कडील बॅग,पैशाचे पॉकेट किंवा मौल्यवान वस्तु लंपास करतात. तेव्हा अशा घटनांपासुन नेहमी सावध व जागरूक रहा.
२.तुमच्या अंगावरील सोन्याचे किंवा मौल्यवान दागीने, मनगटी घडयाळांबाबत सावधानता बाळगा.
३.बस, रेल्वे,वाहतुक गाडी मधुन चढता.उतरतांना गुन्हेगार आपल्या गाफीलपणाचा फायदा उठविण्याचा शक्यता असते तेव्हा चढता.उतरतांना विशेष सतर्क रहा.

४.बस, रेल्वे,वाहतुक गाडी मधुन प्रवास करतांना अनोळखी व्यक्तीं कडुन कोणतेही खाद्यपदार्थ,चहा बिस्कीट, पेयजल घेवु नका अथवा प्राशन करू नका.

५.बस,रेल्वे किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी बेवारस किंवा संशयास्पद वस्तु दिसुन आल्यास त्या वस्तुंना हात लावु नका व आपले मुलांना सुध्दा हात लावु देवु नका. अशा बेवारस किंवा संशयास्पद वस्तु दिसुन आल्यास त्याची माहिती तात्काळ पोलीसांना दया.

## वाहतुकीबाबत तक्रार /सुचना

१.रस्त्यावर कोठेही वाहतुकीची कोढी किंवा अन्य अडचणी दिसुन आल्यास त्याबाबत वाहतुक नियंत्रण कक्ष किंवा जवळचे पोलीस नियंत्रण कक्ष व पोलीस स्टेशनला कळवा.

२.आपणास ॲटोरिक्षा किंवा टॅक्सी चालकाने त्रास दिल्यास त्याबाबत त्याचे वाहनाचा क्रमांक,प्रसंग घडण्याची जागा,दिनांक व वेळ यासह वाहतुक मुख्यालयात वा पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवा.

## बॅकेत जातांना किंवा येतांना

१.रोख रक्कम हातात घेवुन जावु नका.

२.रोख रक्कम असलेली बॅग/ब्रिफकेसची काळजी घ्या. अनोळखी व्यक्तीचे हातात ती देवु नका.

३.कोणीही व्यक्ती आपला पाठलाग करीत नाही याची खात्री घ्या.

४.आपल्या जवळ मोठया प्रमाणांत रोख रक्कम असल्यास त्यावेळी सुपरिचीत व विश्वासु व्यक्तीला आपल्या बरोबर घ्या.आपल्या आसपास दिसुन येणा-या संशयास्पद व्यक्तीबाबत जागरूक व सतर्क रहा. अशा प्रकारचे बहुतांश गुन्हे शनिवारी संध्याकाळी किंवा सोमवारी सकाळी म्हणजे ज्या अर्थी मोठया प्रमाणांत रोख रकमेची ने-आण केली जाते त्यावेळी घडतात.

५.संशयीत व्यक्ती,स्कुटर,मोटार सायकल,कारमध्ये बसलेले दिसुन आल्यास सतर्क व जागरूक रहा,अशा प्रकारे गुन्हा करणा-यांची पध्दत पुढील प्रमाणे असते. तुम्ही रोख रक्कम बॅकेतुन काढीत असतांना एक व्यक्ती तुमच्यावर पाळत ठेवतो आणि सांकेतीक खुण करुन त्याच्या साथिदारांना कळवितो व तो साथिदार तुमची बॅग/रोख रक्कम हिसकावुन नेतो.प्रसंगी तुमच्यावर हल्ला देखील करतो.

६.नेहमी ठराविक वेळी बॅकेत जावु नका, बॅंकेत जाण्याच्या वेळा बदलत रहा. तुमच्या बॅक भेटीचा कोणासही अंदाज येवु देवु नका.

७.बॅकेच्या बाहेर वाहन उभे करतांना वाहनाच्या डिक्कीमध्ये रोख ठेवुन बॅकेत जावु नका.

## बॅकेत असतांना

१.तुमचे पैसे खाली पडल्याचे सांगणा-या व्यक्तीमुळे तुमचे लक्ष विचलीत होवु देउ नका. असे लक्ष विचलीत झाल्यामुळे बॅक काउन्टरवर असलेली आपली रोख रक्कम चोरी जाण्याची अधिक शक्यता असते.

२.पैसे मोजण्यास मदतीचा हात देणा-याकडे लक्ष देवु नका व त्याची मदत घेवु नका.

३.तुमच्यावर कोणी पाळत ठेवित नाही या दक्षता व काळजी घ्या.

## बॅके संबंधिच्या व्यवहाराबाबत सुरक्षित खालील गोष्टी पाळा

१.तुम्ही दिलेला धनादेश (चेकबुक) धनकर्षाची चोरी किंवा दुरूपयोग टाळण्यासाठी त्यावर लक्ष ठेवा.

२.बॅकेचे व्यवहार शक्यतो स्वत:च करा.

३.धनादेश (चेकबुक)पुस्तके नेहमी सुरक्षित जागी ठेवा,तसेच कधीही को-या धनादेशावर स्वाक्षरी करू नका.

४.अदा केलेल्या किंवा जमा केलेल्या धनादेशाच्या नोंदी बॅकेच्या पास बुकामध्ये व्यवस्थीत झाल्या असलयाची खात्री करा. एखादी संशयास्पद नोंद आढळल्यास त्वरीत बॅक व्यवस्थापक / बॅक कर्मचारी यांचे लक्षात आणुन दया.

५.बॅक खात्याच्या मासिक ताळेबंदातील प्रत्येक नोंदीची ती बरोबर असल्याबाबत खात्री करा.

६.बॅकेतुन रोख रक्कम काढतांना संबंधित खिडकी सोडण्यापुर्वी काढलेली रक्कम सावधानतेने व सतर्कतेने मोजुन ती बरोबर असल्याची खात्री करा.

७.अनोळखी इसमाबरोबर पैशांचा व्यवहार करतांना डिमांड ड्राप्ट किंवा पे ऑर्डरची मागणी करा.

८.शक्यतो पोस्टेड धनादेश देणा-घेण्याचे टाळा.

९.धनादेश बाउन्स झाल्यास निगोशियेबत इन्ट्रमेन्ट ॲक्ट १९८१ च्या कलमानुसार आवश्यक ती कार्यवाही करा.

## खालील गोष्टी करणे टाळा

१.बॅकेत अनोळखी व्यक्ती आल्यास बॅकेत खाते उघडण्याकरीता त्यास कधिही शिफारस देवु नका.

२.अनोळखी व्यक्तीचे धनादेश किंवा धनाकर्ष आपल्या खात्यातुन इनकॅश करू नका.

३.आपले खाते बराच वेळा बिना वापर चालु ठेवु नका.

## निनावी पोलीस बना

१.आपणांस एखादा गुन्हा घडतांना आढळल्यास केवळ फोन उचला व जवळच्या पोलीस ठाण्याला किंवा पोलीस नियंत्रण कक्षाला सदर गुन्हयाची माहिती त्वरीत दया.गुन्हेगार किंवा मवाली गुंडाला पकडण्यासाठी आपली मदत करणे एवढे सोपे असुन पोलीसांना सहकार्य करा.

२.वरील बाबतीत आपल्या नावाबददल पुर्ण गुप्तता राखली जाईल. पोलीसांना गुप्त खबर देवुन आपली सतर्क,जागरूक व जबाबदार नागरीकांचे कर्तव्य पार पाडा.

३.अफवांवर विश्वास ठेवु नका.त्याबाबत नक्की खात्री करा. तसेच अफवा पसरवु नका.

४.आपल्या जवळपास संशयीत घडामोडी किंवा व्यक्ती आढळल्यास विशेषत: व्यक्ती अनोळखी असल्यास ताबडतोब नजीकच्या पोलीस स्टेशनला कळवा.

५.आपल्या कुटूंबातील सर्व सदस्यांना संशयीत किंवा बेवारस वस्तुला हात न लावण्याचे तसेच अशा वस्तु न हाताळता त्याबाबत तात्काळ पोलीसांना कळविण्याची जाणीव करून दया.

६.अनोळखी व्यक्ती कडुन खेळणी किंवा खाउ न स्विकारण्याबाबत लहान मुलांच्या मनावर बिंबवा.

७.लहान मुलांकडुन आपला संपर्क क्रमांक वदवुन घ्या.

## महत्वपुर्ण सुचना

**पोलीस नियंत्रण कक्ष / जिहयांतील संपुर्ण ठाण्याचे दुरध्वनी क्रमांक नेहमी जवळ ठेवा.**

***गुन्हेगार व गुन्हेगारीवर नियंत्रण राखण्यासाठी जिल्हा पोलीसांना नेहमी सहकार्य करा.***

**पोलीस अधीक्षक, अकोला**